# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-11.04.2026** **वार- शनिवार**

---

**<u>महात्मा ज्योतिबा फुले जयंती</u>**

थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 200व्या जयंती वर्षाला आजपासून सुरुवात होत आहे. त्यानिमित्त आज त्यांना देशभरातून विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आदरांजली अर्पण केली जात आहे. संसद भवनात प्रेरणा स्थळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी , लोकसभापती ओम बिर्ला, विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, आणि अन्य मंत्र्यांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं. लोकभवन इथं राज्यपालांनी तर विधानभवनातही महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. तसंच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, भिडे वाडा, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय तसंच विविध सामाजिक संस्थामधून महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आलं.

**<u>ज्योति सावित्री</u>**

जिल्हा परिषदेचं प्रशासन आणि तज्ज्ञ संस्थांचं मार्गदर्शन अशा एकत्रित प्रयत्नांमुळे शिक्षणाचा दर्जा उंचावेल, ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळा राज्यासाठी एक 'रोल मॉडेल' प्रकल्प ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे मुळगाव खानवडी इथं ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचं उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं,त्यावेळी ते बोलत होते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून या शाळेची उभारणी झाली असून त्यांनी शाळा उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष घातल्याचंही मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात मंत्री, अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार रावल, गृहराज्यमंत्री योगेश कदम, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, विधान परिषदेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे आणि खासदार सुप्रिया सुळे यावेळी उपस्थित होत्या.

**<u>‘मिशन लक्ष्यवेध’</u>**

राज्यातील क्रीडा विकासाला गती देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ‘मिशन लक्ष्यवेध’ या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत पुणे जिल्हा स्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र कार्यान्वित करण्यात येत आहे, त्यासाठी पात्र खेळाडूंची निवड चाचणी १५ आणि १६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे. क्रीडा प्रशिक्षण व्यवस्था बळकट करणं, पायाभूत सुविधा विकसित करणं, स्पर्धांचं आयोजन, क्रीडा वैद्यकशास्त्र, खेळाडूंना प्रोत्साहन आणि पुरस्कार तसेच करिअर मार्गदर्शन यांसारख्या विविध घटकांचा समावेश करून सर्वांगीण क्रीडा विकास साधण्याचा या योजनेचा उद्देश आहे. प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार असून, त्यासाठी २५ वर्षांखालील महाराष्ट्रातील खेळाडूंना अर्ज करता येणार आहे.इच्छुक खेळाडूंना dsopune6@gmail.com या ई-मेलवर 13 एप्रिल पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत.

**<u>प्रदूषण नियंत्रण बैठक</u>**

राज्यातील वाढतं जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नदी पुनरुज्जीवन कामासाठी स्वतंत्र ‘नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण’ स्थापन करण्याचा निर्णय शासनानं घेतला असून नदी सुशोभीकरण करताना पर्यावरणपूरक आणि प्रदूषणमुक्तीला प्राधान्य द्यावं असे निर्देश पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत पुणे शहरातील मुळा- मुठा नदीच्या प्रदूषण नियंत्रण प्रकल्पाच्या आढावा बैठकीत त्या आज बोलत होत्या.

**सिंबायोसिस विद्यापीठ**

“आपल्या देशातील ६५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ही २७ वर्षांखालील आहे. या निर्णायक टप्प्यावर शिक्षण, कौशल्यविकास आणि धोरणांची भूमिका भारताच्या आर्थिक आणि जागतिक भविष्याला दिशा देणारी ठरेल,” असं महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक आणि धोरण विभागाचे मुख्य सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी सांगितलं. ते आज सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांनी संयुक्तपणे सिंबायोसिस विद्यापीठाच्या लवळे कॅम्पसमध्ये आयोजित केलेल्या स्थित्यंतरातील आंतरराष्ट्रीय शिक्षण:पद्धती, धोरणे आणि दृष्टिकोन" या संकल्पनेवर आधारित आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलत होते.

**आंबा महोत्सव**

‘फळांचा राजा’ म्हणून ओळखला जाणारा आंबा हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून येत्या काळात महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि देशाची राजधानी नवी दिल्ली इथं आंबा महोत्सवाचं आयोजन करण्यात येईल, याकरीता शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील,असं प्रतिपादन राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केलं,ते आज महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेच्यावतीनं मार्केट यार्ड इथं आयोजित 'आंबा महोत्सव-२०२६' च्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

**पाणी टंचाई**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातल्या पूर्व भागात निर्माण झालेल्या पाणी टंचाईवर मार्ग काढण्यासाठी 12 पैकी 8 गांवांमध्ये टँकर सुरू करण्याबाबत आमदार आबाजी काळे यांनी प्रशासनाला निर्देश दिले असून पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मंजूर होऊन पाणी पुरवठा सुरु झाल्याची माहिती खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते यांनी दिली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 39 तर किमान 20 पूर्णांक 9 अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदवलं गेलं. तर आज हवामान कोरडं राहणार असून तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**